
LE VIH FAIT PARTIE
DE MA VIE MAINTENANT
LES RAPPORTS
SEXUELS AUSSI
C'EST POURQUOI J'UTILISE
UN PRESERVATIF.
Let's talk
HIV
Let's talk
SAFER
SEX.
NHS





6

# नितीमूल्य व भाषा




दि इयु इंडिया मिडीया इनिशिएटीव्ह ऑन एच्.आय्.व्ही./एड्स यांनी आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये एच्.आय्.व्ही./एड्स संदर्भातील वेगवेगळे मुद्दे कव्हर करताना जी तत्व पाळायला हवीत त्याची चर्चा झाली. ११२ पत्रकार व कार्यक्रम बनवणारे हे वृत्तपत्र, आकाशवाणी व दूरचित्रवाणी या माध्यमातुन आले होते. २००७ व २००६ साली झालेल्या या कार्यशाळांमध्ये माध्यमांची भुमिका आणि पद्धत यावरही चर्चा झाली.

माध्यमांची भुमिका भारतासारख्या देशात जिथे साक्षरता फार कमी आहे तीथे फारच महत्वाची आहे. त्यातुन दुसरी महत्वाची बाब म्हणजे एच्.आय्.व्ही./एड्स संदर्भातली माहिती लोकं डॉक्टर्सपेक्षा माध्यमातुन अधिक मिळवतात. सहभागी पत्रकार व कार्यक्रम बनवणाऱ्यांनी अनेक नैतिक मुद्दे पुढे केले व त्यावर सखोल अशी चर्चा झाली. या सर्वाला या मंडळींच्या माध्यमातील प्रदिर्घ अनुभवाची पार्श्वभूमी होती.

या चर्चांमध्ये झालेल्या मुद्द्यांचा आढावा आता आपण घेणार आहोत.

## गोपनीयतेचा आदर

कलंक व भेदाभेद यांची भिती इतकी जबरदस्त आहे की लोकं आपल्या वैद्यकीय चाचणीचे अहवाल कुणाला सांगु इच्छित नाहीत. ते एच्.आय्.व्ही. संसर्गीत आहेत हे त्यांना कोणालाही कळू द्यायचं नसतं. आपण त्यांच्या इच्छेचा मान राखायला हवा आणि एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की आपल्या दृष्टीने ती एक स्टोरी असेल पण कुणातरी करता ती एक जीवनमरणाचा प्रश्न होऊ शकते. एच्.आय्.व्ही. संसर्गीत व्यक्तीला बऱ्याच वेळा भेटून एक विश्वासाचं नातं निर्माण करा आणि त्याशिवाय त्याच्या संसर्गाविषयर अगदी आडूनसुद्धा विचारु नका.

## पूर्वपरवानगी

ज्यावेळी एखादी एच्.आय्.व्ही. संसर्गीत व्यक्ती ही तुमच्याशी बोलायला तयार होईल त्यावेळी वास्तव जीवनात त्याचा काय परीणाम होऊ शकतो याची त्याला कल्पना द्या. शक्यतो त्याच्या भाषेत त्याच्याशी बोला, म्हणजे त्याला तुमचं बोलणं समजतय याची तुम्हाला खात्री होईल. तुम्ही त्याला कशा प्रकारे प्रसिद्धी देणार आहात ते तुम्ही त्याला सांगायला हवं व तुमचं लिखाण किंवा कार्यक्रम कुठे छापुन किंवा प्रसारित होणार आहे ते त्याला सांगायला हवं. याव्यतिरिक्त तुमचा कार्यक्रमामागचा किंवा लिखाणामागचा दृष्टिकोनही त्याला स्पष्ट करुन सांगायला हवा.

## बालकांची अधिक काळजी

बालकांची पूर्वपरवानगी ही अधिकच महत्वाची ठरते कारण त्यांना परिस्थितीचं संपूर्ण भान येणं कठीण असतं. अशावेळी आपण मुलांबरोबरच त्यांच्या आई-वडिलांशी किंवा पालकांशी बोलुन पूर्वपरवानगी घेणं आवश्यक आहे. याव्यतिरिक्त त्यांना ही पण कल्पना द्यायला हवी की तुम्ही एखादा कार्यक्रम का करत आहात आणि त्याचा परिणाम काय होणार आहे.

## वस्तूनिष्ठ राहा

एच्.आय्.व्ही./एड्स संसर्गित व्यक्तीला मोकळेपणाने बोलू द्या. पण तुम्ही त्यांची बाजू उचलुन धरणार नाही याची काळजी घ्या. सर्वसंबंधितांकडून गोष्टीचा खरेखोटेपणा तपासून पहा. उदा. सरकार, स्वयंसेवी संस्था, एच्.आय्.व्ही./एड्स संसर्गीत व्यक्ती, त्यांचे शेजारी, डॉक्टर्स वगैरे. त्यांच म्हणणं जरुर मांडा पण कुठल्याही एका गटात सामील होऊ नका. सरकारी धोरणांबाबत अधिकच सावध रहा. त्याचा परिणाम कोणावर व कसा होतोय याची खात्री करुन घ्या.

## उद्दीष्ट स्पष्ट असू द्या.

आपल्या गोष्टींमागील उद्देश आणि ज्या

वाचक श्रोत्यांकरता तुम्ही करत आहात ते कोण आहेत याविषयी फार स्पष्ट कल्पना असणं आवश्यक असतं. व्यक्ती किंवा समुहाविषयी आपलं मत बनवुन घेऊ नका. जेंडर व सेक्स संदर्भातील स्थानिक मतं समजावून घ्या. गैरसमज व भ्रम मनातुन काढून टाका. कायदेशीरदृष्ट्या तुम्हाला स्पष्टीकरण देता येईल इतकी ती निर्दोष ठेवा.

### सुयोग्य भाषेचा वापर

भाषा ही संवेदनशील व राजकीयदृष्ट्या बरोबर असावी. कठीण शब्दांची उधळण नको. संक्षिप्त संज्ञा सुरुवातीला समजावून सांगा. भाषा ही साधी, सोपी व अचूक हवी जेणेकरुन तुम्ही अनेक लोकांपर्यंत पोचू शकाल. तुमची भूमिका ही माहिती देणाऱ्याची असल्याने सनसनाटी निर्माण करण्याचा मोह टाळा. लोकांना गोंधळात टाकणाऱ्या शब्दांचा उपयोग करु नका. गोष्टीचं शिर्षक एकदा तपासून पहा. स्थानिक बोली भाषेचा उपयोग जास्त करा व विज्ञान जास्तीत जास्त सोपं करुन सांगा.

### वास्तव व आकडेवारी

वास्तव व आकडेवारीबद्दल तुम्ही खुपच सावध असायला हवं. त्यासाठी तुम्हाला दुसऱ्या किंवा आणखी तिसऱ्या स्त्रोताचा आधार घ्यावा लागेल. संख्याशास्त्रानुसार उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण योग्य पद्धतीने करा. तुम्ही जो स्त्रोत वापरणार असाल त्याची माहिती द्या व खात्री करा की हे स्त्रोत भरवशाचे आहेत. तुम्ही स्टोरी बनवित असताना त्यामध्ये नजरचुकीनेही चुका रहाणार नाहीत याची खात्री करा. तुमच्या वाचकापुढे सर्व माहिती समोर ठेवा, मग ती माहिती कदाचित सरकार किंवा नॅकोच्या हितसंबंधाविरुद्ध सुद्धा असू शकेल. विषयासंदर्भातील वाद-प्रतिवादाचं विश्लेषण करा पण संघर्ष मात्र टाळा.

### स्त्रोत तपासून बघा

आपल्या स्त्रोताची विश्वासहार्यता तपासून बघा कारण अतिशय प्रामाणिक असलेल्या व्यक्तीदेखील काही माहिती दडवू शकतात. स्वयंसेवी संस्थाचा सहभाग तपासून बघा.

### अखंड वाचन महत्वाचे

एच.आय्.व्ही./एड्स संबंधातील अखंड वाचन तुमची माहिती काळानुरूप ठेवेल. यामुळे एखाद्या अचुक पार्श्वभूमी देणं तुम्हाला सहज जमू शकेल.

### सातत्य

या संदर्भातील माहिती सातत्यपूर्णपणे माध्यमांमधून यावयास हवी. करमणूकीचा भागपण तुमच्या लिखाणात/कार्यक्रमात महत्वाचा आहे. केवळ एड्स दिवसाच्या अनुषंगाने होणारे कार्यक्रम पुरेसे नाहीत. एखादा लेख किंवा कार्यक्रम बनविल्यानंतर तुम्ही काही काळानंतर परत मागोवा घ्या, त्यासंदर्भात आणखी काही करता येईल का याचा विचार करा. सरकारी किंवा स्वयंसेवी संस्थांबद्दल लिहीत असताना हे फार उपयोगी पडतं.

### संपूर्ण माहिती पूरवा

दैनंदिन कार्यक्रमात सर्व बाबींचा अंतर्भाव शक्य नसतो. संपूर्ण माहिती देणाऱ्या मुलाखती तसेच संकेत स्थळांवरच्या माहितीचा आधार घ्या.

### योग्य चित्रांचा वापर

एक चित्र हजारो शब्दांपेक्षा बोलके असते. म्हणूनच त्याचा वापर काळजीपूर्वक करा. कुठलाही एक गट किंवा समूह तुमच्याकडून लक्ष केला जाणार नाही याची काळजी घ्या.

## भाषिक पैलू

भाषा ही व्यक्तीगत पूर्वग्रहविरहीत हवी. भाषेतून अज्ञानाचे प्रदर्शन नको, अस्तीत्वात असलेल्या कलंक पूर्वग्रह , गैरसमजूती, भीती यामध्ये भर पाडणारे शब्द नकोत.

म्हणूनच पत्रकारांना योग्य शब्दांची जाणीव असणे आवश्यक आहे.

सामाजिक व भावनिक दृष्टया संवेदनशील अशा या तांत्रिक विषयावर बोलताना आपण तांत्रिकदृष्टया अचूक अशी साधी सरळ सोपी व अचूक भाषा वापरावयास हवी.

योग्य भाषेची काही लक्षणं -

- योग्य भाषा ही रचनात्मक असते.
- सर्व प्रकारची सनसनाटी भाषेत नसते.
- घासुन गुळगुळीत झालेले शब्द नसतात.
- ती पूर्वग्रहदुषित किंवा कलंक वाढवणारी नसते.
- ती संबंधित वाचकांच्या दृष्टीने योग्य असते. यासाठी पत्रकाराला तांत्रिक शब्दांची माहिती असणं आवश्यक आहे.
- ती भेदाभेद किंवा निर्णय देत नाही.
- ती सकारात्मक व सक्षम करणारी असते.
- ती तटस्थ व जेंडर सेन्सीटीव्ह असते.
- ती तांत्रिकदृष्ट्या अचूक असते पण कठिण शब्द लोकांना सहज कळतील याची काळजी घेतलेली असते.





# संवेदनशीलतेचे लिखाण

| टाळा ✗ | का ? | वापरा ✓ |
|---|---|---|
| एड्स | म्हणजे मदत खरा शब्द आहे<br>Acquired Immune Deficiency Syndrome | एड्स |
| एच्.आय्.व्ही. आणि एड्स | एच्.आय्.व्ही. आणि एड्स परस्पर संबंधित आहे. | एच्.आय्.व्ही./ एड्स |
| एड्स विषाणू<br>एच्.आय्.व्ही.विषाणू | एच्.आय्.व्ही. या संक्षिप्त रूपातच विषाणू शब्द आहे. त्यामुळे एच्.आय्.व्ही. विषाणू हे गोंधळात टाकू शकते | एच्.आय्.व्ही. |
| एड्स ची महामारी | असे शब्द सनसनाटी निर्माण करतात. तो आवरता येणार नाही अशी हताश भावना निर्माण करतात | एच्.आय्.व्ही.साथ |
| एड्सचा रोग | एड्स हा रोग नव्हे तो विविध लक्षणांचा समूह आहे. | एड्समूळे होणारे संधीसाधू आजार जसे क्षयरोग, कर्करोग इत्यादि |
| पूर्णपणे विकसीत एड्स | एच्.आय्.व्ही. व एड्स मध्ये फरक लक्षात घेतला तर अर्धवट विकसीत एड्स असं काही नसत. | एड्स |
| एड्स चाचणी<br>एच्.आय्.व्ही. पकडणे | एड्सकरता चाचणी नसते चाचणी एच्.आय्.व्ही.ची होते.<br>लोक एच्.आय्.व्ही. संसर्गित होतात त्यामुळे संसर्गिक होणे असा शब्दप्रयोग करावा. | एच्.आय्.व्ही.चाचणी<br>एच्.आय्.व्ही. संसर्गिक होणे. |
| एड्सवाहक<br>सेफ सेक्स | एच्.आय्.व्ही. संक्रमित होतो व एड्स व्यक्तीला होतो.<br>कुठलाही संबंध १०० टक्के सुरक्षित नसतो. | एच्.आय्.व्ही. संक्रमित व्यक्ती<br>सेफर सेक्स |
| शारीरीक स्त्राव | सर्व स्त्रावांत एच्.आय्.व्ही.वाहत नाहीत. | वीर्य , मातेचे दूध, रक्त , योनी स्त्राव |
| एच्.आय्.व्ही.चे बळी<br>एड्सग्रस्त<br>एड्स रूग्ण | यावरून हातबलता दिसते.<br>एड्स झालेल्या व्यक्ती बऱ्यापैकी आरोग्यदायी जीवन जगू शकतात.<br>आजाराच्या संदर्भातच केवळ हा शब्द वापरावा. | एच्.आय्.व्ही. संसर्गिक व्यक्ती<br>एच्.आय्.व्ही. संसर्गिक व्यक्ती<br>एड्स संसर्गिक व्यक्ती |
| निष्पाप<br>वेश्या | यातून दुसऱ्या कुणाचा तरी दोष जाणवतो<br>हा शब्द अवमानकारक आहे. | पूर्णपणे टाळावा.<br>शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रिया |
| मादक पदार्थाच्या आहारी गेलेले | मादक पदार्थ घेणाऱ्यांविषयी सहानुभूतिपूर्वक दृष्टीकोन हवा. | शिरेद्वारे मादक पदार्थाचे सेवन करणारे. |